महाराष्ट्र शासन
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:maharashtra.cetcell@gmail.com

क्र. कृशिप्र-१३२५/प्र.क्र. ००२/एसईबीसी-ओबीसी/जावैप्र/सुचना/९९२ दिनांक : १३/०५/२०२५

## जाहीर सुचना

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कृषी व कृषी संलग्न पदवी अभ्यासक्रमांकरीता एसईबीसी (SEBC) आणि ओबीसी (OBC) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी सादर करावायाच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत,**

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय संकिर्ण-२०२४/ प्र.क्र.७५/आरक्षण-५, दि. ०२/०५/२०२५

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कृषी व कृषी संलग्न पदवी अभ्यासक्रमांकरीता एसईबीसी (SEBC) आणि ओबीसी (OBC) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी संदर्भिय शासन निर्णयाच्या दिनांकापासून अधिकचा तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. त्यानुसार सदरील उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ०१/०८/२०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

परंतु बऱ्याच उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत प्रवेशित महाविद्यालयात जमा / अपलोड केले नाही अशा सर्व उमेदवारांना पुढील प्रमाणे कळविण्यात येत आहे-

१) ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध आहे परंतू कॅप पोर्टलमध्ये अपलोड केले नाही. अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ प्रवेशित महाविद्यालयाकडे जमा करावे आणि संबंधित महाविद्यालयाने सदर जात वैधता प्रमाणपत्र महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (MCAER) यांच्याकडे जमा करावे आणि सदर प्रमाणपत्र महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (MCAER) हे त्यांच्या लॉगईनमधून कॅप पोर्टलमध्ये अपलोड करेल.

२) तसेच, ज्या उमेदवारांना अद्याप पर्यंत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही अशा उमेदवारांनी संबंधित जिल्हा पडताळणी समितीकडून आपले जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्यात यावे आणि विहित कालावधीत प्रवेशित महाविद्यालयाकडे जमा करावे आणि आणि संबंधित महाविद्यालयाने तात्काळ सदर जात वैधता प्रमाणपत्र महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (MCAER) यांच्याकडे जमा करावे. तद्नंतर सदर प्रमाणपत्र महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे त्यांच्या लॉगईनमधून कॅप पोर्टलमध्ये अपलोड करतील.

३) तसेच उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्याकडे जमा केले असेल तर सदर महाविद्यालयांनी आणि उमेदवारांनी कॅप पोर्टलमध्ये सदर प्रमाणपत्र अपलोड केले आहे की नाही याबाबत खातरजमा करावी.

वरीलप्रमाणे अधिकच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या उमेदवारांचे प्रवेशाबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची सर्व संबंधित उमेदवार व शैक्षणिक संस्था यांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**